


# SAFFRON & BLACK

# मुंबई

## तुलना ठाकरी तेजपर्व अन् काळ्या गद्दारयुगाची!



ही पुस्तिका मराठी माणसांच्या
रणझुंजार एकजुटीला ‘शिवसेना’
हे नाव देणाऱ्या परमवंदनीय
प्रबोधनकार ठाकरे ह्यांना आणि त्या
‘शिवसेना’ नावाच्या ज्वलंत विचारांना
धगधगत ठेवत ‘महाराष्ट्र’ आणि ‘राष्ट्र’ तेजोमय
करणाऱ्या वंदनीय हिंदुहृदयसम्राट
शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे ह्यांना
सविनय अर्पण करत आहोत...

**शिवसेना**

उद्धव बाळासाहेब ठाकरे

भविष्याचा वेध घेऊन आगामी शेकडो वर्षांसाठी
मुंबई शहराची भक्कम पायाभरणी करणारे,
**महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, शिवसेना पक्षप्रमुख**
**सन्मा. श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे** आणि
आधुनिक दृष्टिकोनातून मुंबई - महाराष्ट्रातील
शहरांचा शाश्वत विकास व्हावा म्हणून
प्रयत्नशील असणारे **शिवसेना नेते,**
**आमदार सन्मा. श्री. आदित्य उद्धव ठाकरे**
ह्यांच्या परवानगीने सादर करत आहोत मुंबईच्या
क्षितिजावर उमटलेलं प्रगतीचं भगवं पर्व !

# ₹४०,००० कोटींचा अर्थसंकल्प आणि ₹१२,००० कोटींच्या मुदत ठेवीसह अर्थसंपन्न मुंबई महापालिका!



# दिवाळखोरीत गेलेली महापालिका सावरली आणि ‘मुंबई’ देशातील श्रीमंत महापालिका झाली!

**१९९७ साली** मुंबई महापालिकेवर शिवसेनेची सत्ता आली तेव्हा महापालिकेच्या अर्थसंकल्पात ६०० कोटी रु. ची महसुली तूट होती. पण **उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी काटेकोर अर्थ नियोजन सुरु** केलं, महापालिकेच्या उत्पन्नाचे स्रोत सक्रिय केले. मुंबई महापालिकेच्या कारभारात आर्थिक शिस्त आणली. महसुलाचा यथायोग्य विनियोग केला.

**परिणामी २०२२ सालापर्यंत**, मुंबई महापालिकेचा **अर्थसंकल्प तब्बल ४० हजार कोटींपर्यंत** गेल्या व **मुदत ठेवी ₹९२ हजार कोटींपर्यंत** पोहचल्या. आणि, मुंबई श्रीमंत महापालिका ओळखली जाऊ लागली... त्यामुळेच १९९७ सालापासून ते २०२२ सालापर्यंत अनेक राजकीय स्थित्यंतरं घडली पण **सुज्ञ मुंबईकर अखंडपणाने उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मुंबईची सत्ता शिवसेनेच्या हाती देत राहिला.**

दिवाळखोरीत गेलेल्या
मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प
‘उद्धव बाळासाहेब ठाकरें’च्या
उत्तम आर्थिक नियोजनामुळे
गोवा, त्रिपुरा, सिक्कीम, नागालँड,
मिझोराम, अरुणाचल प्रदेश
ह्या राज्यांपेक्षा व मालदीव,
भूतान, आयसलँड ह्या देशांपेक्षा
अधिक आहे.

बरं, ही महसुली तूट भरून काढताना **मुंबईकरांवर कोणताही अवाजवी किंवा छुपा कर लादला नाही.**

## उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी मुंबईतील ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांचा 'मालमत्ता कर' कायमचा माफ केला.



ह्याचा बृहन्मुंबईतील **१६ लाख १४ हजार निवासी सदनिकाधारकांना लाभ** झाला.

तसंच मुंबईकरांना मनस्ताप न होता 'कर देयक' भरताना सुलभता असावी म्हणून महानगरपालिका संकेतस्थळावर पेमेंट गेटवे, mybmc 24x7 मोबाईल ॲप, नेट बँकींग, यूपीआय, डेबिट - क्रेडिट कार्ड, पेमेंट वॉलेट, एनईएफटी, आरटीजीएस अशा सर्व सुविधा उपलब्ध केल्या.

# मुंबई महापालिकेने तब्बल ₹ ९२००० कोटींच्या मुदत ठेवी का राखून ठेवल्या होत्या?

उद्या जगावर कोणतंही अर्थसंकट आलं तरी **मुंबई महापालिकेसारखं आंतरराष्ट्रीय महानगर कोलमडू नये** ह्यादृष्टीने ठेवलेल्या मुदत ठेवी मुंबईहितासाठी अत्यंत महत्त्वाच्या होत्या.

शहर नियोजनाच्या दृष्टीने ह्या मुदत ठेवी काही महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी राखून ठेवल्या होत्या. उदा. गोरेगाव-मुलुंड लिंक रोड (GMLR) हा रस्ता 'टोल फ्री' राहिला तो ह्याच नियोजनामुळे. तसंच ह्याच ठेवींमध्ये **सागरी सेतू म्हणजेच कोस्टल रोडसाठी १२,५०० कोटी रु. तरतूद** करुन ठेवली होती.

तसंच, महानगराच्या गरजेप्रमाणे सांडपाणी प्रक्रिया केंद्र, जलशुद्धीकरण प्रकल्प, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सारख्या **पायाभूत सुविधांसाठी, महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी, त्यांच्या निवृती वेतनासाठी** ह्या मुदत ठेवी राखीव ठेवल्या होत्या.

# भारतातील सर्वोत्तम
# महानगरीय बससेवा म्हणजे
# मुंबईकरांची ‘बेस्ट’
# आणि तिकीट दर होता...
# फक्त ₹ ५/-



## शिवसेनेच्या काळात ४३८ मार्गावरून अत्यंत 'माफक तिकीट दरा'त प्रत्येक दिवशी ३० लाख+ प्रवाशांना ३५००+ बेस्ट बसेस सेवा देत असत.

शहरातील कष्टकऱ्यांसाठी वरदान असणारी **सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अनेकदा खासगी भिडूंना मोकळं रान मिळावं, ह्यासाठी जाणूनबुजून मारली जाते.** पण ही लूट मुंबईकरांच्या वाट्याला येऊ नये म्हणूनच **उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी मुंबई महापालिकेच्या 'बेस्ट'ला कायम प्राधान्य दिलं.**

त्यानंतर, २०१३ सालापासून आदित्य उद्धव ठाकरे मुंबईत इलेक्ट्रिक बससेवेसाठी आग्रही होते. त्यादृष्टीने आदित्य ह्यांनी एक ध्येय ठरवलं कि, **२०२७ पर्यंत मुंबईत संपूर्णतः पर्यावरणपूरक, वातानुकूलित आणि सर्वात स्वस्त व स्थिर तिकीट दरांसह १०,००० इलेक्ट्रिक बेस्ट बसेस** मुंबईकरांच्या सेवेत रुजू करायच्या.


SWITCH
बेस्ट

२०१८ साली आदित्य ह्यांनी अजून एक ध्येय पूर्ण केलं ते म्हणजे मुंबईकरांना वातानुकूलित आणि सुसज्ज बससेवा द्यायची तीही अत्यंत माफक तिकिट दरांमध्ये...

५ कि.मी. साठी फक्त ₹५/-
१० कि.मी. साठी फक्त ₹१०/-
१५ कि.मी. साठी फक्त ₹१५/-
आणि फक्त ₹२०/- तर मुंबईत कुठेही.

## आणि हो, ५ कि.मी. साठी फक्त ₹५ रु. हे जगातील सर्वात स्वस्त प्रवासभाडं होतं !

(पण २०२२ सालानंतर महायुतीने हे प्रवासभाडं दुप्पट केलं आहे.)

आज मुंबईत **संपूर्णतः आधुनिक, इलेक्ट्रिक आणि पर्यावरणपूरक एसी बस, मिनी बस, मिडी बस, लॉन्ग बस, डबल डेकर** अशा बस दिसतात त्याचं सर्व श्रेय आदित्य उद्धव ठाकरे ह्यांना जातं.

महानगरीय वीज वितरण प्रणालीत जगातील लॉस एंजेलिस, सिएटल, टोरांटो, झ्युरिच, व्हिए-न्ना, म्युनिक ह्या शहरांच्या मालिकेत आपल्या मुंबईच्या BEST वीज वितरण प्रणालीचं नाव घेतलं जातं.




**प्रत्येक ५ मिनिटांला सुरु असणाऱ्या फोर्ट फेरीमुळे** प्रतिवर्षी ५० लाख+ मुंबईकरांना ऑफिसला वेळेवर पोहोचणं सुलभ झालं.

अनेक शहरांतील पब्लिक ट्रान्सपोर्ट सिस्टम्स आचके देत असताना **आपली 'बेस्ट' नवनव्या उपक्रमांसह आजही मुंबईच्या रस्त्यांवर दिमाखात धावते ती आदित्य उद्धव ठाकरेंच्या आधुनिक व पर्यावरणपूरक व्हिजनमुळेच.**

BEST हे महापालिकेमार्फत वीज वितरण करणारं भारतातील सर्वात मोठं, स्वस्त व यशस्वी मॉडेल.

# महापालिका शाळांबद्दलची धारणा बदलणारा... ‘मुंबई पब्लिक स्कुल’ चा यशस्वी प्रयोग !



## ‘मुंबई पब्लिक स्कूल्स’ या एका लक्षवेधी प्रकल्पाने आदित्य उद्धव ठाकरेंनी महापालिकेच्या शिक्षणव्यवस्थेचा चेहरामोहराच बदलून टाकला.



शाळांच्या सुसज्ज व देखण्या इमारती, अत्याधुनिक शिक्षणपद्धती आणि पूर्णपणे मोफत, शिक्षण यामुळे ज्या मनपा शाळांमध्ये **दरवर्षी सुमारे ३० हजार विद्यार्थ्यांची घट होत होती, त्या शाळांमध्ये आता प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची प्रचंड रिघ** लागू लागली.

१,२३४ शाळांमध्ये ८ भाषिक माध्यमांमध्ये

**३,२५,०००+ विद्यार्थ्यांना शिक्षण**

सुसज्ज ई-वाचनालय, मोफत BEST बससेवा, गणवेश, दप्तर, आरोग्य शिबीरं, मुलींसाठी सॅनिटरी पॅड्स, व्हेंडिंग मशिन्स अशा स्वरूपातील

**२८ शालेय साहित्य मोफत**

पहिली महापालिका जिथे सॅटेलाईटच्या सहाय्याने

**६००+ व्हर्चुअल क्लासरूम**

विद्यार्थ्यांच्या दप्तरातील ओझं कमी व्हावं ह्यासाठी

**६२०००+ विद्यार्थ्यांना शैक्षणिक टॅब**


मनपा शाळांची सुसज्ज इमारत




सभागृह


Table of Size and Distance
MILKY WAY - 200 BILLION STARS
100 000 Light Years


MUMBAI PUBLIC SCHOOL
BMC Introduces Quality Education
MPS Woollen Mill





**जगातील एकमेव महापालिका जिथे CBSE, ICSE, IGCSE, IB आणि SSC या सर्व बोर्डांतून मोफत शिक्षण** दिलं जातं आणि त्यासाठी पूर्वीचे शिक्षक कमी न करता त्यांना नव्या पद्धतीनुसार प्रशिक्षित करण्यात आलं.

**शाळांची ४०–४५% पर्यंत घसरलेली गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांची समग्र जाण वाढवण्यासाठी, आदित्य उद्धव ठाकरे यांनी अनेक सामाजिक संस्था, शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षकांना सोबत घेऊन एक रोडमॅप तयार केला. त्याचा परिणाम असा की, आज ती गुणवत्ता ८५–९०% पर्यंत उंचावली आहे.**

**मुलींची शालेय उपस्थिती वाढवण्यासाठी प्रोत्साहन भत्ता** देण्याची योजनाही राबवली गेली.

मध्यान्ह भोजनात विद्यार्थ्यांना पोषणयुक्त आहार मिळावा म्हणून आदित्य ठाकरे यांनी ‘मुंबई पब्लिक स्कूल्स’मध्ये ‘अक्षयपात्र’ आणि महिला बचत गटांमार्फत **आरोग्यदायी व रुचकर मध्यान्ह भोजन देण्याची व्यवस्था** उभी केली.

# दरवर्षी १,००,४४,००० रु-गणांवर माफक दरात वैद्यकीय उपचार करणारी आशियातील सर्वात मोठी महापालिका!



‘प्राथमिक आरोग्य’ सेवा पुरवणं हीच साधारणपणे महापालिकेची जबाबदारी असते.

**पण मुंबई महापालिका**
**ही एकमेव महापालिका आहे जी...**
**४ वैद्यकीय महाविद्यालयीन रुग्णालयं,**
**१ दंत महाविद्यालय,**
**२९ प्रसूतिगृहं,**
**१६ उपनगरीय रुग्णालयं,**
**६ विशेष रुग्णालयांमधून**
**गरजू रुग्णांना आरोग्य सेवा पुरवते.**

महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये **अंदाजे १५,००० रुग्णशय्या मुंबईकरांच्या सेवेसाठी उपलब्ध.**

**कर्करुग्णांच्या उपचारांसाठी अद्ययावत ‘प्रोटॉन थेरपी’ सुविधा उपलब्ध** करुन देणारी भारतातील पहिली महानगरपालिका म्हणजे मुंबई महापालिका.

**मुंबई महापालिकेच्या १९० दवाखान्यांमध्ये, २१२ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये किमान ९०% वैद्यकीय सेवा आणि १४०+ जीवनावश्यक औषधं पूर्णपणे मोफत दिली जातात.**



१६ उपनगरीय रुग्णालयांमध्ये **सिटीस्कॅन, एमआरआय, सोनोग्राफी, ईसीजी, एक्स-रे या सेवा रुग्णांना मोफत, तर डायलिसिस नाममात्र दरात** उपलब्ध.

महापालिकेच्या प्रसूतिगृहांमध्ये **नवजात बालमृत्यू दर अत्यंत कमी** आणि नवजात बाळांसाठी **मोफत लसीकरण.**

**मुंबई महापालिकेचं आरोग्य बजेट** हा काही देशांच्या राष्ट्रीय आरोग्य बजेटपेक्षाही जास्त.

अशी जनसामान्यांना परवडणारी आरोग्य व्यवस्था
**उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी कुटुंबप्रमुखाप्रमाणे सांभाळली.**

# भारतातील सर्वात स्वस्त पाणीपुरवठा करणारी मुंबई महापालिका प्रतिहजार लिटर पाण्यासाठी आकारते फक्त ₹३.५०/-





## मुंबई महापालिकेने बांधलेलं ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा धरण’ हे जगातील ९ वे सर्वात वेगानं बांधलं गेलेलं धरण आहे.

यामुळे मुंबई महापालिकेची पाण्याची एकूण साठवण क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली.

उद्धव बाळासाहेब ठाकरे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी या धरणावर वीजनिर्मिती केंद्र उभारण्यासाठी मुंबई महापालिकेसाठी मार्ग सुकर झाला आणि मुंबईला एका विशाल धरणासह एक वीजनिर्मिती मिळालं.

चीन किंवा जपानमध्येही नसलेले, आशियातील सर्वात मोठं जलशुद्धीकरण केंद्र मुंबई महापालिकेनं उभारलं आहे.

**आमचं आवाहन की, जिथे हे जलशुद्धीकरण केंद्र आहे, तिथे प्रक्रिया केलेलं पाणी बिसलेरीच्या पाण्यापेक्षाही शुद्ध आहे.**

शिवसेनेच्या कार्यकाळात पाणीपुरवठ्याचं नियोजन इतकं सुनियोजित होतं कि, कितीही दुष्काळाचं सावट असलं तरी मुंबईला भीषण पाणीटंचाई कधीच जाणवली नाही.



**मुंबईकरांना पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांची एकत्रित लांबी ७,००० किलोमीटर आहे म्हणजे मुंबईपासून लंडनपर्यंत-च्या अंतराइतकी !**

**दूषित पाण्याचा पुरवठा होऊ नये म्हणून** 'मरोळ ते रुपारेल' आणि 'रुपारेल ते कुलाबा' अशा **जलवाहिन्या १० फूट खोलवर** नेण्यात आल्या.

पाण्याचा दाब आणि गळतीसाठी जलवाहिन्यांवर **SCADA System (Supervisory Control and Data Acquisition System) द्वारे देखरेख** ठेवली जाते, जे इतर शहरांत सहसा आढळत नाही.

# मुंबईतील कोस्टल रोड हे उद्धव बाळासाहेब ठाकरेंचं फक्त स्वप्न नव्हे तर एका कुशल राज्यकर्त्याची चुणूक दाखवणारा प्रकल्प



# भारतातील पहिल्या अन् एकमेव ‘सागरी किनारी मार्गा’चं निर्विवाद श्रेय जातं उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या दूरदृष्टीला.





जेव्हा उद्धव बाळासाहेब ठाकरे मुख्यमंत्री झाले तेव्हा कोस्टल रोडच्या कामाला गती मिळाली. अत्याधुनिक तंत्राचा वापर करुन **भारतातील पहिला समुद्राखालील बोगदा (Undersea Tunnel)** पूर्ण झाला.

टनेल बोरिंग मशीन (TBM) ला ‘मावळा’ हे नाव देऊन अभियांत्रिकी क्षेत्रातील अचाट काम मुंबईने करुन दाखवले.



**नरिमन पॉईंट ते दहिसरपर्यंतचं अंतर फक्त २० मिनिटांत** पार करता यावं हे व्हिजन होतं उद्धव बाळासाहेब ठाकरेंचं.

**समुद्री जीवसृष्टीला धक्का न लावता, पर्यावरण तज्ज्ञांच्या देखरेखीखाली** भराव क्षेत्राचं काम (Reclamation) पूर्ण करण्यात आलं.

कोस्टल रोडचा प्रकल्प आखतानाच **५०+ हेक्टर नवीन मोकळ्या जागा, समुद्रकिनारी प्रॉमेनाड्स, लँडस्केप्ड गार्डन्स, अम्फीथिएटर झोन्स, सायकल-जॉगिंग ट्रॅक्स** या सर्व पूरक सुविधांचं नियोजन करण्यात आलं.

कामांची सर्व कंत्राटं जागतिक स्पर्धात्मक निविदांद्वारे (Global Competitive Bidding) दिली गेली. हा संपूर्ण प्रकल्प राबवताना उद्धव बाळासाहेब ठाकरेंवर **कुण्या एकानेही भ्रष्टाचाराचा आरोप केला नाही.**

**ह्याव्यतिरिक्त, शिवसेनेने मुंबईत १९४८ किलोमीटर्सचं रस्त्यांचं जाळं विणलं आहे म्हणजेच ‘फ्रान्स ते पोलंड’ ह्या आंतरराष्ट्रीय अंतराइतकं.**

कोविडसारख्या अभूतपूर्व संकटातही तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी वरळी-शिवडी कनेक्टरचं काम सुरु केलं, तसंच अटल सेतू (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक) चा पहिला गर्डर जानेवारी २०२० मध्ये लॉन्च करुन अल्पावधीत ८२% काम पूर्ण.

**हिंदमाता - परळ उड्डाणपुलांमधील कनेक्टर** केवळ २.५ महिन्यांत पूर्ण करण्यात आला.

सुमारे २० कि. मी. लांबीच्या **एल. बी. एस. मार्ग** व **अंधेरी-घाटकोपर लिंक रोडचं रुंदीकरण व सुधारणा.**

**'घाटकोपर-मानखुर्द उड्डाणपुला'**मुळे नवी मुंबई, ठाणे आणि शीव मार्गावरील प्रवासात २५ मिनिटांची बचत.

वाहतूक कोंडीमुक्त परळ परिसरासाठी **प्रशासकीय अडथळे पार करुन 'डिलाईल पुल'चं काम केलं.**

**मृणालताई गोरे उड्डाणपुल, कोरा केंद्र उड्डाणपुल, सातरस्ता ते महालक्ष्मी उड्डाणपूल** ह्या नव्या उड्डाणपुलांमुळे मुंबईकरांना वाहतूक कोंडीतून मुक्ती मिळेल.

**३२ सार्वजनिक वाहनतळ,** ९१ ठिकाणी **'पे ॲण्ड पार्क'** मुंबईत कार्यान्वित.

**मुंबईत कार्यरत १६ संस्थांशी उद्धव बाळासाहेब ठाकरे इतक्या कुशलतेने समन्वय साधत कि, ना वाहतूक ठप्प व्हायची, ना मुंबईकरांना त्रास व्हायचा !**

# कोविड व्यवस्थापनाच्या ‘मुंबई मॉडेल’चं जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) आंतरराष्ट्रीय स्तरावर कौतुक केलं !



# कोविड काळात ज्यापद्धतीने मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी महाराष्ट्राला सांभाळलं, त्यामुळे महाराष्ट्राने त्यांना ‘कुटुंबप्रमुख’ हा बहुमान दिला!



**२०१९ च्या अखेरीस** महाराष्ट्रात नुकत्याच निवडणुका पार पडल्या होत्या आणि **उद्धव बाळासाहेब ठाकरे मुख्यमंत्री झाले होते, आणि ते ‘शेतकरी कर्जमाफी’सारखे कल्याणकारी निर्णय घेत असतानाच ‘कोविड १९’चं अभूतपूर्व आव्हान** आपल्या जगासमोर आलं.


मा. मुख्यमंत्री
MARUTI
TISSUES



कोरोना संसर्ग थांबविण्यासाठी टाळेबंदी आवश्यक होती पण तत्कालीन मुख्यमंत्री **उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी कुठेही आततायीपणा, भीतीचं वातावरण निर्माण न करता** जनतेला पूर्वकल्पना देत **टाळेबंदी आणली.**

त्यानंतर मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी **प्रशासनावर लक्ष** केंद्रित केलं. **तज्ज्ञ डॉक्टरांचा टास्कफोर्स** तयार केला. **प्रशासनाला पूर्ण मोकळीक** दिली.

उद्धवजी एकीकडे राज्यकर्ता म्हणून जितके धीट होते तसेच दुसरीकडे कुटुंब प्रमुखाप्रमाणे **जनतेशी आपुलकीने संवाद साधायचे, जनतेपासून काहीही न लपवता सर्व स्थितीची माहिती द्यायचे** आणि लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करायचे.

मुंबईच्या तत्कालीन आयुक्तांच्या कोविड कार्यकाळावर आधारित 'COVID WARRIOR - Iqbal Singh Chahal' ह्या पुस्तकातील **तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी कोविड काळात बजावलेल्या आश्वासक भूमिकेची इनसाईड स्टोरी थक्क करणारी आहे.**

मुंबईत ‘चेस द व्हायरस’ अभियान आक्रमकपणे राबवलं. दारोदारी चाचण्या, शोधमोहीम, तपासणी, प्राथमिक उपचार, जनजागृती केली. टीकेचा भडीमार सुरु होता, अफवांचा बाजार उठला होता पण उद्धवजींनी कोणताही राजकीय दबाव सरकारी, वैद्यकीय यंत्रणांवर येऊ दिला नाही.

मुंबईला वाचवणारं ‘जंबो कोविड केंद्र’ उभं करण्यासाठी उद्धवजींनी दिवसरात्र अधिकाऱ्यांसह बसून तातडीने प्रशासकीय मंजुरी आणल्या. या **जंबो कोविड केंद्रांशिवाय मुंबई कोरोनाच्या पहिल्या लाटेत तग धरू शकली नसती.**

वांद्रे-कुर्ला संकुलातील हे **पहिलं ‘कोविड जंबो रुग्णालय’ १८ दिवसांच्या विक्रमी वेळेत बांधलं.** जिथे १० लाखाहून अधिक कोविड रूग्ण यशस्वीपणे उपचार घेऊन घरी परतले.



विषाणूमधील बदल आणि संसर्गाचं केंद्रस्थान कळावं म्हणून **उद्धवजींनी मुंबईच्या नायरच्या संलग्न कस्तुरबा रुग्णालयात महाराष्ट्रातील पहिली जीनोम सिक्वेन्सिंग प्रयोगशाळा उभारली** आणि त्यामुळे कोरोना व्हायरसमधील म्युटेशन्स (जीन बदल) वेगाने शोधण्यात मदत झाली.





तसंच, आदित्य उद्धव ठाकरेंनी कॉर्पोरेट्च्या मदतीने वरळी डोममध्ये **६०० हून अधिक कोविड खाटा आणि कोविड आयसीयूंसह पहिलं 'जंबो फील्ड हॉस्पिटल'** उभारलं.

**कोविड विरुद्धच्या लढाईत आदित्य उद्धव ठाकरे २४x७ सक्रिय असत.** आदित्यजींना कोविड संसर्ग झाल्यानंतरही त्यातून बरे होताच त्यांनी पुन्हा झोपडपट्ट्यांमध्ये, कंटेनमेंट झोनमध्ये दररोज फेरफटका मारायला सुरुवात केली.

**पहिल्याच टप्प्यात कॉर्पोरेट्च्या सामाजिक बांधिलकी निधीतून (CSR) मुंबईला १० लाख लसींचा साठा मिळवून देण्यात पालकमंत्री आदित्य उद्धव ठाकरे ह्यांचा मोलाचा वाटा होता. यामुळे मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मोफत लसीकरण शक्य झालं.**

अवघ्या काही महिन्यात **४८,००० खाटा, ३,९०० ICU आणि १५०० बालरुग्ण खाटांची ११ जंबो सेंटर्स आणि १८४ हॉस्पिटल्स** कोविडसाठी सज्ज करण्यात आली.







मुंबई महापालिकेला रुग्णवाहिका कमी पडत आहेत हे तत्कालीन आयुक्तांकडून समजताच आदित्यजींनी तातडीने पाठपुरावा सुरु केला आणि पुढच्या फक्त ५ दिवसांतच ८०० वाहनांची व चालकांची व्यवस्था करण्यात आली.

देशात प्रथम आपल्या शहरातच ऑक्सिजन निर्मिती करण्याचा उद्धवजींचा मानस निर्णायक ठरला. लसींची जेव्हा टंचाई भासू लागली त्याची कारणं काहीही असतील पण उद्धवजींनी प्रशासनाचा धीर खचू दिला नाही. त्यांनी प्रशासनाला, राज्याला आश्वासित केलं कि,
"लस मिळणार. आपण तयार राहू."

**अनेक प्रशासकीय अधिकारी सांगतात, तेव्हाच्या बैठकांमध्ये उद्धवजी अतिशय शांत, पद्धतशीर, तथ्यांवर, तर्कावर आधारित चर्चा करायचे.**
**त्यांनी प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या होत्या, "टीका होईल म्हणून कोणतेही आकडे लपवू नका, खऱ्या माहितीवर काम करु. आपण जिद्दीने लढू आणि नक्की ह्या संकटावर मात करू. "**

## ७२५+ नवीन उद्यानं आणि खेळाची मैदानं, अत्याधुनिक नाट्यगृह, जलतरण तलाव, संयुक्त महाराष्ट्र दालन आणि बरंच काही.



## शहरातील मोकळ्या जागा त्या शहराची फुफ्फुसं असतात म्हणूनच मुंबईतील मोकळ्या जागा आणि नैसर्गिक वैभव जपण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे कमालीचे आग्रही असतात.





'मुंबईतील मोक्याच्या जागा, मैदानं, मिठागरं, कांदळवनं, वृक्षसंपदा, उद्यानं ह्यांवर गंडांतर येतं तेव्हा त्या अघोरी विनाशाच्या प्रकल्पांना 'ठाकरी' शैलीत कडाडून विरोध केला जातो. 'आरे' सारख्या प्रचंड जैविविधता असलेल्या हरितपट्ट्याला उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी मुख्यमंत्री असताना 'जंगल' म्हणून घोषित केलं.

## वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणीसंग्रहालय

उद्यानाचं पुनरुज्जीवन, प्राण्यांची शास्त्रीय पद्धतीने देखभाल आणि पेंग्विनसारख्या बर्फाळ प्रदेशातील प्राण्यांना पाहण्याची संधी मुंबईकरांना उपलब्ध करुन देणं अशा उपक्रमांनी आदित्य ठाकरे यांनी उद्यानाचा असा काही कायापालट केला की, आज या उद्यानातून मुंबई महापालिकेला प्रत्येक दिवशी लाखोंचा महसूल मिळतो.















## एलिव्हेटेड नेचर वॉकवे, मलबार हिल

हा मुंबईतीलच नव्हे तर देशातील पहिला ‘एलिव्हेटेड नेचर वॉकवे’ प्रकल्प आहे. तुम्हाला असाच ‘ट्री टॉप वॉक’ प्रकल्प सिंगापूरमध्ये पाहायला मिळतो.

आदित्य उद्धव ठाकरेंच्या संकल्पनेतून राबविला गेलेला हा ‘नेचर वॉकवे’ दाट झाडीतून नेत अरबी समुद्राचे विहंगम दृश्य पाहण्याचा सुखद अनुभव देतो.



## सागरी सौंदर्य दर्शक मंच

मुंबईकरांच्या विरंगुळ्यासाठी आणि शहरी सौंदर्यासाठी आदित्य उद्धव ठाकरेंनी स्टॉर्म वॉटर ड्रेन आऊटफॉल्सचे रूपांतर सागरी सौंदर्य दर्शक मंचांमध्ये केले आहे.

दादरला त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर Sea Viewing Deck आणि गिरगाव Sea Viewing Deck हे लाटांची किमया, सूर्यास्ताची सोनेरी रेघ आणि मुंबईच्या किनाऱ्याचं अप्रतिम सौंदर्य अनुभवण्याची संधी देतात.











# श्री गणेश द्वार, दादर

हे गणेश द्वार कला अन् अध्यात्माचा उत्तम संगम आहे. मुंबईत ही कमान उभारताना उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी प्रशासकीय अडथळे तर हटवलेच, पण कलात्मक सहकार्यही केलं.









## मुंबईत गोराईत उभारलं देशातलं पहिलंवहिलं कांदळवन उद्यान (Mangrove Park)

मुंबईचं सुरक्षाकवच असणाऱ्या कांदळवनांचं रक्षण करण्यासाठी **तत्कालीन पर्यावरण मंत्री आदित्य उद्धव ठाकरे ह्यांनी ११,००० हेक्टरपेक्षा अधिक कांदळवन क्षेत्र संरक्षित तर केलंच** आणि **गोराईला ८ हेक्टरच्या परिसरात भारतातील पहिलं 'मॅनग्रोव्हज पार्क'**ची निर्मिती करून पर्यावरण धोरणात राज्याला एक दिशा दिली.

या उद्यानात ७४० मीटर लांबीचा उंच लाकडी पदपथ आहे, ज्यामुळे **पर्यटकांना दाट खारफुटीचा परिसर पर्यावरणाला हानी न पोहोचवता पाहता येतो.**

हे उद्यान पर्यावरण शिक्षण आणि संवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी तयार करण्यात आलं आहे, ज्यामध्ये **निसर्ग माहिती केंद्र आणि पक्षीनिरीक्षण मनोरा (वॉचटॉवर)** देखील आहे.


म
AHIM
UMBAI - १६



# माहीम किल्ला व रेतीबंदर

ऐतिहासिक महत्त्व असलेल्या माहीम किल्ल्याचं पुनरुज्जीवन तत्कालीन आदित्य उद्धव ठाकरे यांच्या पुढाकाराने करण्यात आलं आहे. किल्ल्यावरील अतिक्रमण हटवून संरक्षक भिंती बांधून हा माहीम किल्ला सर्वांसाठी खुला करण्यात आला. २४६० चौ.मी. आकाराच्या ह्या पर्यटन स्थळात सुशोभित रेतीबंदर, ओपन जीम, वॉच टॉवर अशा लोकोपयोगी गोष्टी उपलब्ध आहेत.



## नाट्यगृहं, जलतरण तलाव आणि मैदानं

मुंबई महापालिकेने ४–५ उत्कृष्ट नाट्यगृहांची उभारणी केली असून, मुलुंडमधील महाकवी कालिदास नाट्यगृह आधुनिकतेचा आदर्श नमुना आहे. तसंच ११ सुसज्ज जलतरण तलाव आणि ७२५ हून अधिक उद्यानं आणि मैदानं जी मुंबईकरांच्या सेवेस रुजू आहेत.









## हेरिटेज वॉक - सफर ऐतिहासिक मुंबईची

मुंबईतील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या विलोभनीय वास्तू मुंबईकरांना, पर्यटकांना त्यांच्या इतिहासासह पाहता याव्यात ह्यासाठी आदित्य उद्धव ठाकरेंनी मुंबईत 'हेरिटेज वॉक' सुरु केले आणि मुंबईचा ऐतिहासिक वारसा अनेकांना अनुभवता आला.

# मुंबई २४x७

मुंबईसारख्या जागत्या शहरात रात्री कामानिमित्त असेल किंवा शहर अनुभवण्यासाठी बाहेर पडलेल्या मुंबईकरांना हॉटेल्स, कॅफे, निवांत आणि सुरक्षित जागा अशा सोयी उपलब्ध व्हाव्यात ह्यासाठी आदित्य उद्धव ठाकरेंनी 'मुंबई २४x७' ही संकल्पना मांडली. पण तेव्हा मोठा गहजब उभा केला गेला, पार्टी-पब कल्चर म्हणत हिणवलं गेलं पण कालांतराने हीच संकल्पना केंद्र सरकारने अमलात आणली. आज मुंबईकर '२४ तास हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि मुंबई' अनुभवत आहेत ते व्हिजन होतं आदित्य उद्धव ठाकरेंचं.



# शहरावर प्रचंड ताण आणि भौगोलिक मर्यादा असताना उत्कृष्ट कचरा, सांडपाणी व आपत्ती व्यवस्थापन



## २०१७ पर्यंत मुंबईत प्रतिदिनी १० हजार मेट्रिक टन इतका कचरा गोळा केला जायचा म्हणजे १०० रणगाड्यांच्या वजनाइतका अवाढव्य.

शिवसेनेने कचरा वर्गीकरणावर भर दिला. त्यासाठी मार्गदर्शन, प्रदर्शन शिबिरं आयोजित केली. ओला - सुका कचरा वर्गीकरण, विलीनीकरण व्हायलाच पाहिजे हा दृढनिश्चय केला, नागरिकांना प्रोत्साहित केलं.

गृहसंकुलं, सेवाभावी संस्था, तज्ञ कंपन्यांना एकत्र आणून, केवळ **एका वर्षात कचऱ्याचे प्रमाण १०,००० मेट्रिक टनांवरून ६,५०० मेट्रिक टनांपर्यंत कमी करण्यात यश.** ‘झीरो वेस्ट’ राबवणाऱ्या इमारतींना मालमत्ता करात ५% सूट दिली.

प्रत्येक दिवशी ४०० टन कचऱ्यावर उगमस्थळीच प्रक्रिया. देवनार डम्पिंग ग्राऊंडवर रोज २,४०० टन कचऱ्यापासून वीज निर्मिती करणारे दोन प्रकल्प उभारले.

मुंबईत साचणारं पावसाचं पाणी समुद्रात फेकण्यासाठी इर्ला, हाजी अली, लव्हग्रोव्ह, ब्रिटानिया, क्लिव्हलँड, गझदरबंध अशा ६ पम्पिंग स्टेशन्समधून ७५००० दशलक्ष लीटर पाण्याचा निचरा केला जातो!

मुंबईत वरळी, वांद्रे, धारावी, वर्सोवा, मालाड, घाटकोपर, भांडुप अशी ७ सांडपाणी प्रक्रिया केंद्र (STPs) कार्यरत. ज्यांची एकत्रित क्षमता सुमारे २,४६४ एमएलडी (MLD - दशलक्ष लिटर प्रतिदिन) आहे. प्रक्रिया केलेलं पाणी उद्यान, मैदान, वाहन धुणे, इतर उद्योग व इमारती वापर दिलं जातं.






मुंबईच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे शहरातील ५,००० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधून थेट फीड येते, ज्यामुळे आपत्कालीन परिस्थितीवर लक्ष ठेवणं आणि प्रतिसाद देणं सोपं होतं, हे कॅमेरे अग्निशमन दल, पोलीस आणि इतर यंत्रणांसोबत समन्वयासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

हे होतं मुंबईवर निस्सीम प्रेम
करणाऱ्या आणि महाराष्ट्राच्या
राजधानीला आपुलकीने
घडविणाऱ्या **उद्धव बाळासाहेब
ठाकरेंच्या कार्यकाळात
मुंबईच्या क्षितिजावर उमटलेलं
एक तेजस्वी भगवं पर्व!**

हेच ‘थैलीशहां’ना बघवलं नाही
आणि मग त्याने कावा खेळलाच
आणि फंदफितुरांना घेऊन
२०२२ सालापासून
मुंबईचा काळा अध्याय
सुरु झाला...

गेल्या २५ वर्षात अथक परिश्रमातून घडविलेल्या आपल्या मुंबईची ‘ॲनाकोंडा’ आणि त्याच्या हस्तकाने अडीच वर्षात वाताहात केली. कशी? ते तुम्हीच पुढे वाचत जा आणि मुंबईवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाची तळपायाची आग मस्तकात जाईल.



₹६०० कोटींच्या महसुली तुटीमध्ये असलेल्या मुंबई महापालिकेला ₹९२ हजार कोटींच्या सरप्लस स्थितीपर्यंत उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी नेलं होतं. पण 'मिंधे गँग'ने त्या मुदत ठेवींतील १० हजार कोटी रुपये मोडून उधळपट्टी केली आणि आता तब्बल २.२५ हजार कोटींची आर्थिक तूट आहे. पुढील ४ वर्षांत महापालिकेला कर्मचाऱ्यांचे पगार देणंसुद्धा कठीण होणार आहे.



महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये आणि दवाखान्यांमध्ये औषधांचा तुटवडा जाणवू लागला आहे. एक्स-रे फिल्मसह इतर वैद्यकीय सेवांसाठी लागणाऱ्या साहित्याच्या कंत्राटांमध्येही गंभीर अनियमितता दिसत आहे. वैधता संपण्याच्या मार्गावर असलेली औषधं कमी दरात खरेदी केली जात असून, निष्पाप मुंबईकरांच्या जीवाशी खेळ केला जात आहे.

मुंबई गिळू पाहणाऱ्या 'ॲनाकोंडा'ने एक-एक करून मुंबईची बलस्थानं कमकुवत करण्यास सुरुवात केली आहे.

सर्वप्रथम लक्ष्य करण्यात आलं ते मुंबईच्या जीवनवाहिनी ‘BEST’वर. BEST बससेवेचा ताफा वाढवण्याऐवजी तो २ हजारांपर्यंत घटवण्यात आला. ‘५ कि.मी. ला फक्त ५ रुपये’ हे जगातील सर्वात स्वस्त असलेला तिकीट दरसुद्धा आता दुप्पट करण्यात आला आहे.

पुढचा घाव केला गेला तो ‘मुंबई पब्लिक स्कूल’वर. कोणताही अभ्यास न करता प्रत्येक वॉर्डमध्ये CBSE शाळा जाहीर केली, पण तिथे ना प्रशिक्षित शिक्षक, ना नियोजन, ना यंत्रणा, ना सुविधा.

विद्यार्थ्यांसाठी आदित्य ठाकरेंनी सुरू केलेले ‘Astronomy Club’ आणि ‘वाघोबा क्लब’ही बंद करण्यात आले. इतकंच नाही तर विद्यार्थ्यांना शाळेचा गणवेशसुद्धा मिळाला नाही.

मुंबईत पहिल्यांदाच भीषण पाणीटंचाई सहन करावी लागली. अनेक ठिकाणी टँकर्स मागवण्याची वेळ आली. २०२२ पूर्वीचं जल-नियोजन पूर्णपणे कोलमडलं आणि कुठे पाण्याचा दाब कमी, तर कुठे गढूळ पाणी अशा तक्रारी करत मुंबईकरांना अनेक ठिकाणी संघर्ष करावा लागला.

१ वर्षात रस्ते खड्डेमुक्त करू, मुंबईतील सर्व रस्ते काँक्रीटचे करु हे सर्व दावे सपशेल खोटे ठरले.

उलट निवडक कंत्राटदारांना हाताशी धरून रस्ता दुरुस्ती प्रकल्पांमध्ये ₹६००० कोटींचा घोटाळा करण्यापर्यंत मिंधेच्या कुशासनाची मजल गेली.

२०२२ आधी रस्त्यांची कामं ३१ मे पर्यंत काम पूर्ण व्हायची पण यंदा मुंबई खोदून ठेवल्याने मुंबईकरांची तारांबळ उडाली.

कोस्टल रोड प्रकल्पाचा खर्च तर वाढविलाच आणि तिथे जाहिरातीचे महाकाय नियमबाह्य होर्डिंग्स लावून शहर विद्रुप करून त्यातूनही मलिदा खायचा प्रयत्न झाला.

सीएसएमटीजवळील हिमालय पुल २०१३ साली कोसळून ७ निष्पाप नागरिकांचा बळी गेला होता. हा पुल बांधणाऱ्या RPS इन्फ्राप्रोजेक्ट कंपनीलाच पश्चिम उपनगरातील सिमेंट काँक्रीट रस्त्याचं ₹१,५६६ कोटींचे कंत्राट देण्यात आलं.

‘ॲनाकोंडा’ आणि त्याच्या हस्तकांनी मुंबईतील मोकळ्या जागा, मिठागरे अदानीच्या घशात घातल्या आहेत.

मिंधेच्या कुशासनात मुंबईत ४-४ दिवस कचरा उचलला जात नाही. कळस म्हणजे मुंबईतील देवनार डम्पिंग ग्राऊंडही अदानीला जवळपास फुकट दिलं गेलं आहे.

मुंबईच्या इतिहासात आतापर्यंत कधीही ‘कचरा टॅक्स’ (Garbage Tax) लागू झालेला नव्हता पण ह्या गद्दारांना तोही लावला, कारण गद्दारांना मुंबईकरांना लुबाडायच आहे.

मुंबई महापालिकेच्या २०० एमएलडी (Million Ltrs per Day) प्रतिदिन क्षमतेच्या आणि पुढे ४०० एमएलडीपर्यंत वाढवता येऊ शकणाऱ्या ₹४,००० कोटींच्या डिसॅलिनेशन प्रकल्पाच्या टेंडर प्रक्रियेत मोठा घोळ झाला आहे.

मुंबई महापालिकेकडे ₹५५० कोटींची थकबाकी कंत्राटदारांकडून येणे बाकी आहे, हा मुंबईकरांचा हक्काचा पैसा का वसूल केला जात नाही? वर्षानुवर्षे थकबाकी असूनही कारवाईचा बडगा उगारला जात नाही.

स्ट्रीट फर्निचरमध्ये (बस थांबे, बाकडे, कचराकुंडी, आकर्षक फुलदाण्या, रस्त्यावरील दिवे, सूचना फलक, दिशादर्शक फलक) शेकडो कोटींचा घोटाळा. ₹२६३ कोटींची अनावश्यक तरतूद केली. प्रत्यक्ष गरजेपेक्षा ₹१०० कोटी जास्त खर्च करण्यात आला.

मुंबईतील बटबटीत सुशोभीकरणाच्या शेकडो कोटींच्या कंत्राटांसाठी मोनोपॉली तयार करण्यात आली.

भ्रष्टाचार इतका बोकाळला आहे की खुद्द सत्ताधारी भाजपच्या नगरसेवकाला "दक्षिण मुंबईतील ₹१,३०० कोटींच्या सीसी रस्त्यांच्या कामाची चौकशी करा" असं पत्र अँटी करप्शन ब्युरो (ACB) म्हणजे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला लिहावं लागलं.

मुंबईतील तब्बल १,१०० एकर जमीन अदानींच्या घशात फुकटात घातल्यानंतर, आता क्रॉफर्ड मार्केटजवळील छत्रपती शिवाजी महाराज मंडई, मलबार हिलवरील BEST चे पॉवर स्टेशन आणि वरळीतील अस्फाल्ट प्लांटची जागा खासगी बिल्डरांच्या घशात घालण्याचा डाव.

गेल्या २५ वर्षांत केलेलं आमचं निवडक काम
आम्ही तुमच्यासमोर मांडलं. ते पाहताना आणि
वाचताना तुम्हाला जाणवलंच असेल की,
**आम्ही आपली मुंबई**
**आपुलकीने घडवली, प्रेमाने जपली.**
त्यामुळेच आम्हाला ठाम विश्वास आहे कि,
मुंबईवर मनापासून प्रेम करणारा आमचा
स्वाभिमानी मुंबईकर कितीही डाव आखले गेले,
कितीही कट रचले गेले तरी
अपप्रचाराला बळी पडणार नाही.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख
स्व. बाळासाहेब ठाकरे यांना अभिप्रेत मुंबई
शाश्वत विकासाच्या दिशेने पुढे नेऊया,
मुंबई महापालिकेवर पुन्हा डौलाने
'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' पक्षाचा अस्सल,
महाराष्ट्राभिमानी भगवा फडकवूया !

**जय महाराष्ट्र !**













mumbaiwantsthackeray.in

शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे

विशेष मार्गदर्शन
युवासेनाप्रमुख, शिवसेना नेते श्री. आदित्यजी ठाकरे

संकल्पना व निर्मिती
शिवसेना राज्य संघटक श्री. अखिल अनिल चित्रे